# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय लातूर.

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

दुरध्वनी (०२३८२) २९५५६०   E-Mail vdsshlatur@gmail.com

**जा.क्र.विदेशावैमला/अतिविशेषोपचार/व.नि./ ५५१२ /२०२४.**   **दिनांक:-०६.०७.२०२४**

-:: जाहिरात ::-

शासन निर्णय क्र.१) पदनि-२४२०/प्र.क्र.१३७/२०२०/वैसेवा-१,दिनाकं:-०८.०१.२०२१ व २) शासन शुध्दीपत्रक पदनि-२४२०/प्र.क्र. १३७/२०२०/वैसेवा-१,दिनाकं:-१८.०६.२०२१ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर येथील खालील प्रमाणे वरिष्ठ निवासी संवर्गातील रिक्त पदे निवड समितीमार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी बंधपत्रीत व अहर्ताप्राप्त पात्र उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयीन वेळेत मिळेल. अर्ज करतेवेळी उमेदवार शासकीय/अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विहीत मार्गाने व विहीत नमुन्यात सादर करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जणार नाही. वरिष्ठ निवासीचे पदे विभागानुसार खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विषय व पदे | खुला | अनुसुचित जाती (एस.सी) | अनुसुचित जमाती (एस.टी.) | विमुक्त जाती (अ) | भटक्य जमाती (ब) | भटक्य जमाती (क) | भटक्य जमाती (ड) | इतर मागास वर्ग (ओबीसी) | समाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | विशेष मागास वर्ग (एसबीसी) | ई. डब्ल्यू.एस. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **युरोसर्जरी**<br>वरिष्ठ निवासी १ | | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| २ | वरिष्ठ निवासी २ | | | | | | | | | | | | |
| ३ | वरिष्ठ निवासी ३ | | | | ०१ | | | | | | | | ०१ |
| ४ | **कार्डीओलॉजी**<br>वरिष्ठ निवासी १ | | | | | | | | | | | | |
| ५ | वरिष्ठ निवासी २ | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | वरिष्ठ निवासी ३ | | | | | | | | | ०१ | | | ०१ |
| ७ | **न्युरोसर्जरी**<br>वरिष्ठ निवासी १ | | | | | | ०१ | | | | | | ०१ |
| ८ | वरिष्ठ निवासी २ | | | | | | | | | | | | |
| ९ | वरिष्ठ निवासी ३ | | | | | | | | | | | | |
| १० | **न्युओनेटॉलॉजी**<br>वरिष्ठ निवासी १ | ०१ | | | | | | | | | | | ०१ |
| ११ | वरिष्ठ निवासी २ | | | | | | | ०१ | | | | | ०१ |
| १२ | **न्युरॉलॉजी**<br>वरिष्ठ निवासी १ | | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १३ | वरिष्ठ निवासी ३ | | | | | | | | | ०१ | | | ०१ |
| | एकुण | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०० | ०० | ०८ |

अतिविशेषोपचार पदवीधारकास प्राध्यान्य

**शैक्षणिक अर्हता:- वरिष्ठ निवासी**:- राष्ट्रीय/भारतीय अयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार व महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलची डी.एम. कार्डीओलॉजी, डी.एम. न्युरॉलॉजी, डी.एम. न्युओनेटॉलॉजी, एम.सी.एच. न्युरोसर्जरी, एम.सी.एच. युरोसर्जरी, पदवी कायम नोंदणी आवश्यक आहे.

**कार्डीओलॉजी व न्युरॉलॉजी**

वरिष्ठ निवासी १ संबंधीत विषयात डी.एम.प्राध्यान्य किंवा एम.डी.मेडीसीन / डी.एन.बी. मेडीसीन

वरिष्ठ निवासी २ संबंधीत विषयात डी.एम.प्राध्यान्य किंवा एम.डी.मेडीसीन / डी.एन.बी. मेडीसीन तसेच १ वर्षाचा अतिविशेषोपचार रुग्णालय /एन.एम.सी. मान्यता प्राप्त अनुभव

वरिष्ठ निवासी ३ संबंधीत विषयात डी.एम.प्राध्यान्य किंवा एम.डी.मेडीसीन / डी.एन.बी. मेडीसीन तसेच २ वर्षाचा अतिविशेषोपचार रुग्णालय /एन.एम.सी. मान्यता प्राप्त अनुभव

**न्युरोसर्जरी व युरोसर्जरी**

वरिष्ठ निवासी १ संबंधीत विषयात एम. सीएच. प्राध्यान्य किंवा एम.एस.जन. सर्जरी / डी.एन.बी. जन.सर्जरी

वरिष्ठ निवासी २ संबंधीत विषयात एम. सीएच. प्राध्यान्य किंवा एम.एस.जन. सर्जरी / डी.एन.बी. जन.सर्जरी तसेच १ वर्षाचा अतिविशेषोपचार रुग्णालय /एन.एम.सी. मान्यता प्राप्त अनुभव

वरिष्ठ निवासी ३ संबंधीत विषयात एम. सीएच. प्राध्यान्य किंवा एम.एस.जन. सर्जरी / डी.एन.बी. जन.सर्जरी तसेच २ वर्षाचा अतिविशेषोपचार रुग्णालय /एन.एम.सी. मान्यता प्राप्त अनुभव

**न्युओनेटॉलॉजी**

वरिष्ठ निवासी १ संबंधीत विषयात डी.एम. प्राध्यान्य किंवा एम.डी.बालरोग / डी.एन.बी. बालरोग

वरिष्ठ निवासी २ संबंधीत विषयात डी.एम. प्राध्यान्य किंवा एम.डी.बालरोग / डी.एन.बी. बालरोग तसेच १ वर्षाचा अतिविशेषोपचार रुग्णालय /एन.एम.सी. मान्यता प्राप्त अनुभव

**वेतन:-** वरिष्ठ निवासी :१ करिता रु. ७१००/- व इतर भत्ते असी एकुण रु. ६७८८१/-

वरिष्ठ निवासी :२ करिता रु. ७४००/- व इतर भत्ते असी एकुण रु. ६९५६४/-

वरिष्ठ निवासी :३ करिता रु. ७७००/- व इतर भत्ते असी एकुण रु. ७१२४७/-

**वयोमर्यादाः-** वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | अर्ज विक्रीचा दिनांक | ०६ / ०७ /२०२४ ते ०९ / ०७ /२०२४ (कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून) |
| ०२ | अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक | १० / ०७ /२०२४ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून) |
| ०३ | मुलाखतीचा दिनांक | ११ / ०७ /२०२४ (गुरुवार) दुपार ४:०० अधिष्ठाता, यांचे कार्यालय येथे |

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रेः-** अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

०१ प्रमाणपत्र - एम.बी.बी.एस., एम.डी./एम.एस, डी.एम./एम.सी.एच. संबंधीत विषयातील

०२. महाराष्ट्र मेडीकल कॉन्सील नोंदणी प्रमाणपत्र-एम.बी.बी.एस., एम.डी./एम.एस, डी.एम./एम.सी.एच. संबंधीत विषयातील

**०३.** गुणपत्रीका - एम.बी.बी.एस., एम.डी./एम.एस, डी.एम./एम.सी.एच. संबंधीत विषयातील

०४. बंधपत्रीत उमेदवार असल्याबाबत महाविद्यालयाचे पत्र.

**०५.**अनुभव प्रमाणपत्र (प्राध्यान्य अतिविशेषोपचार रुग्णालयातील कामाचा)

**०६.**मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

**०७.**विजा अ,भज ब, भज क, इमाव , विमाप्र, साठी चालू आर्थिक वर्षाचे उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

**०८.**जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र.

**०९.** आधार कार्ड झेरॉक्स.

वरीष्ठ निवासी पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती १८० दिवसासाठी अस्थाई स्वरुपाची राहील, व उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल. रुजु होतवेळेस रु.१००००/- (अनामत रक्कम) जमा करावे लागेल व पुर्व सुचना न देता राजीनामा दिल्यास अनामत रक्कम मिळणार नाही.

**<u>गुणवत्ता यादी (मेरीट लिस्ट) खालील निकशावर बनविण्यांत येईल.</u>**

संबंधीत विषयातील पदव्युत्तर पदवी, विषयानुसार गुणवत्ता यादी खालील निकषानुसार करण्यांत येईल.

अ. मराठवाडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, येथून पदवीचे गुण.

ब. मराठवाडा बाहेरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून पदवीचे गुण.

क. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातुन पदवीचे गुण

नोट :-

१. सदरील वरिष्ठ निवासी यांची पदे ही बंधपत्रीत उमेदवारासाठी असल्यामुळे महाराष्ट्र राज्या बाहेरील विद्यार्थ्यांचा वरिष्ठ निवासी या पदासाठी विचार केला जाणार नाही.

२. यापुर्वी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे काम करीत असताना आपले काम असमाधानकारक असल्यामुळे जर आपली नियुक्ती रद्य केली असल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

३. वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी/अधिक करण्याचा तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याचा अथवा प्रलंबीत ठेवण्याचा अथवा नियुक्ती रद्द करण्याचा अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे.

४. विहीत नमुना अर्जाची किंमत रु.१००/- आहे. रोखपाल यांचेकडे रोख रु.१००/-चा भरणा केल्यानंतर अर्जाचा पुरवठा करण्यांत येईल.

५. उपरोक्त आरक्षणानुसार संबंधीत विभागाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास नियमाप्रमाणे इतर संवर्गातील उमेदवारांना प्राधन्य देण्यांत येईल. तसेच पदसंख्या, आरक्षण यात बदल अथवा कमी/ अधिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता त्यासाठीचे सर्व अधिकार संस्था प्रमुखांनी राखुन ठेवले आहे.

६. सदरील वरिष्ठ निवासी पदे ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ६ महिण्याकरीता देण्यात येवुन पुढील आदेश समाधानकारक कामावर अवलंबुन असतील याची नोंद घ्यावी

७. वेळोवेळी निर्गमीत होणारे शासन परिपत्रक, निर्णय सर्वांना बंधककारक असतील.

**अधिष्ठाता,**
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय लातूर.

प्रतः १. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,.......